# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : १९१४३ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १५ डिसेंबर, २०२१

:: परिपत्रक ::

विषय: **सन, २०२१ चे हिवाळी अधिवेशन कालावधीत मंत्रालयीन विभागांनी विधान भवन, मुंबई येथे प्रवेश मिळण्यासाठी कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने पाळवयाच्या सूचनांबाबत ...**

महाराष्ट्र विधानमंडळाचे **सन, २०२१ चे हिवाळी अधिवेशन बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१** रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होत आहे. सदर अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिका देण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(१) अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांच्या कार्यालयातील खाजगी सचिव अथवा एक स्वीय सहायक यांनाच प्रवेश देण्यात यावा, असा निर्णय दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या विधानसभा व विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला असल्याने त्याप्रमाणे 'खाजगी सचिव' यांच्या स्वाक्षरीने **१६ डिसेंबर, २०२१** पर्यंत उपस्थित राहणाऱ्यांची नावे या सचिवालयास कळवावीत.

(२) मंत्रालयीन विभागांनी विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी जास्तीत जास्त १० अधिकाऱ्यांची व १० कर्मचाऱ्यांची नावे त्यांच्या विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने **१६ डिसेंबर, २०२१** रोजीपर्यंत या सचिवालयास कळवावीत. जेणेकरून प्रवेशपत्रिका वितरणापूर्वी प्रवेशपत्रिकेवर संबंधितांचे नाव, पदनाम, विभाग इ.माहिती लिहिणे सोईचे होईल. **विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

(३) सन २०२१ च्या विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाकरिता प्रवेशपत्रिका उपलब्ध करून घेतल्यानंतर त्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रवेशपत्रिका धारण करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे छायाचित्र व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा शिक्का असणे अनिवार्य राहील.

(४) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र व प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

(५) मा.मंत्री/राज्यमंत्री, आस्थापना तसेच, संबंधित मंत्रालयीन विभागाने दिलेले ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असेल तरच विधानभवनामध्ये प्रवेश देण्यात येईल.

(६) अधिवेशन कालावधीत दैनंदिन अतिरिक्त प्रवेशपत्रिकांची मागणी उप सचिवांच्या स्वाक्षरीने न करता आपल्या **विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने करावी. सदरील प्रवेशपत्रिका फक्त ग-१ कक्ष, १७ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे उपलब्ध होतील.**

(७) पावसाळी अधिवेशन, २०२१ साठी घेतलेल्या प्रवेशपत्रिकांच्या दुरूपयोग होऊ नये यासाठी प्रत्येक विभागाने सदर प्रवेशपत्रिका न चुकता परत कराव्यात व त्यानंतर हिवाळी अधिवेशन, २०२१ साठीच्या अधिवेशनाच्या प्रवेशपत्रिकांची मागणी करावी.

(८) **विधान भवन, मुंबई येथे प्रवेशासाठी कोविड-१९ लसीकरणाचे दोन्ही डोस पूर्ण झालेल्या मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांनी शासनमान्य प्रयोगशाळेतील RT-PCR चाचणी नकारात्मक (Negative) असल्याचा दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजीनंतरचा व पुढील आठवडयासाठी दिनांक २५ डिसेंबर, २०२१ नंतरचा अहवाल अधिवेशन कालावधीत प्रवेश करतेवेळी सोबत ठेवावा. सदर अहवाल पाहूनच विधान भवन, मुंबई येथे प्रवेश देण्यात येईल. विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सामाजिक अंतर राखणे सोईचे व्हावे यासाठी अधिकारी/कर्मचारी यांनी नियोजित वेळेपूर्वी उपस्थित राहणे आवश्यक राहील.**

(९) **वास्तव्याच्या जवळपास शासनमान्य प्रयोगशाळा उपलब्ध न झाल्यास अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे येणारे मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी हे विधान भवन, मुंबई येथे दिनांक २० व २१ डिसेंबर, २०२१ रोजी तसेच, पुढील आठवडयासाठी दिनांक २५ व २६ डिसेंबर, २०२१ रोजी RT-PCR चाचणी करुन घेण्याच्या सुविधेचा वापर करु शकतात. याकरीता त्यांनी www.mls.org.in/covid-report/rtpcr.html या लिंक वर जाऊन तेथे देण्यात आलेल्या वर्गवारी नुसार नोंदणी करुन टोकन क्रमांक प्राप्त करुन घ्यावा व विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वारासमोर उभारण्यात आलेल्या कोरोना चाचणी केंद्र येथे जाऊन टोकन नंबर सांगून व स्वत:चे ओळखपत्र दाखवून कोरोना चाचणी करुन घ्यावी. त्यानंतर विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वार येथे**

.. ३/-

**करण्यात आलेल्या व्यवस्थेच्या ठिकाणी संबंधितांना त्यांचे कोरोना चाचणीचे अहवाल उपलब्ध करुन देण्यात येतील.ज्यांचे चाचणी अहवाल नकारात्मक (Negative) असतील अशा व्यक्तींनाच विधान भवन येथे प्रवेश देण्यात येईल. विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सामाजिक अंतर राखणे सोईचे व्हावे यासाठी सर्व मान्यवर व्यक्ती तसेच, अधिकारी/कर्मचारी यांनी नियोजित वेळेपूर्वी उपस्थित राहणे आवश्यक राहील.**

(१०) **कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

वरील सुरक्षाविषयक तसेच, कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने देण्यात आलेल्या सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

**(राजेश तारवी)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रत माहितीस्तव:**

(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
(२) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

**प्रति :**

(१) मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री/मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मंत्रालयीन विभागाचे सर्व प्रधान सचिव/सचिव

**याची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

(१) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी, संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
(२) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.